# प्राचीन व मध्ययुगीन संस्कृती PPT 2

मागील भागात आपण ग्रीसमधील राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवन यांचा सविस्तर अभ्यास केला.

या भागात आपण ग्रीसमधील सांस्कृतिक जीवन, कला व स्थापत्य, क्रीडा आणि तेथील धर्मकल्पना यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

# सांस्कृतिक जीवन –

- ग्रीक लेखन परंपरा सर्वात जुनी आहे.
- इ.स. पूर्व १०व्या शतकात होमर हा महान कवी होऊन गेला.
- त्याने इलियड व ओडिसी ही महाकाव्ये लिहिली, त्यामुळे जगाला काव्य व इतिहासाची ओळख झाली.

महाकवी होमर




- इलियड व ओडिसी ही वीरमहाकाव्ये किंवा ‘हिरोइक एपिक्स’ म्हणून ओळखली जातात.
- इलियडचा विषय ट्रोजन लोकांचे ग्रीकांबरोबर झालेले युद्ध, हा आहे.
- काही पिढ्यांच्या पराक्रमाची व त्यांच्या प्रमुख नायकांची वर्णने या शौर्यगाथांतून येतात.
- होमरने आकिलीझ या महायोद्धयाची क्रोधकहाणी यात मांडलेली आहे.


- ओडिसी या महाकाव्याचा विषय ट्रोजन युद्धावरून माघारी निघालेला इथाकाचा राजा ओडिस्यूस उर्फ यूलिसीझ घरी परतताना त्याच्यावर कोसळणारी संकटे, इथाका येथे पुनरागमन आणि पत्नी पनेलपी हिच्याशी भेट हा आहे.
- या महाकाव्यात अनेक लोककथांचा उपयोग होमरने केला.
- ग्रीक वाङ्मयाचा पाया ही महाकाव्ये आहेत.
- होमर फक्त ग्रीसचा राष्ट्रकवी नसून, तो पहिला थोर युरोपीय साहित्यिकही आहे.

# ग्रीक कलावंत –

- ग्रीसमध्ये पिंडार हा गीतकार होऊन गेला.
- ग्रीक लोक हे नाटयप्रेमी होते.
- शोकांतिका (शोकांतिका म्हणजे नाटकाचा शेवट दु:खदायक असणे) हा नाटयप्रकार ग्रीकांनी रुढ केला.
- सोफोक्लीसची नाटके आज ही प्रसिध्द आहे.
- शिक्षकांच्या मदतीने मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी भाषेतील शोकांतिकेचे (प्रत्येकी एक) उदाहरणे शोधा.

सोफोक्लीस





पिंडार

- सध्या सोफोक्लीसची पुढील सात नाटकेच उपलब्ध आहेत :
  १. अँटिगॉन ( इ. स. पू. ४४१)
  २. ईडिपस टिरॅनस
  ३. इलेक्ट्रा
  ४. अजॅक्स
  ५. द विमेन ऑफ ट्रेचिस
  ६. फिलॉक्टीटीझ (इ. स. पू. ४०९)
  ७. ईडिपस अॅट कलोनस ( इ.स.पू. ४०१).



पु. ल. देशपांडे (१९१९–२०००) ह्यांनी ‘ईडिपस रेक्स’ चे मराठी भाषांतर केले आहे.




सदानंद रेगे (१९२३–८२) ह्यांनी ‘ईडिपस टिरॅनस’ या नाटकाचे रुपांतर जयकेतू ह्या नावाने केले आहे.

**सुशील परभृत**


अँटिगॉन, ईडिपस टिरॅनस आणि ईडिपस ॲट कलोनस ह्या नाटकांची मराठी भाषांतरे सुशील परभृत ह्यांनी केली आहेत.

# हिरोडोटस –


- इ.स. पूर्व ५ व्या शतकात हिरोडोटसने ग्रीसचा समग्र व शास्त्रशुध्द इतिहास पहिल्यांदा लिहिला.
- यामुळे हिरोडोटसला इतिहासाचा जनक म्हणतात.
- इतिहासात त्याने सागरी सत्तेचे महत्त्व सांगितलेले आहे.
- सॉक्रेटीस, प्लेटो व ॲरिस्टॉटल हे त्याचे समकालीन होत.




हिरोडोटस



सॉक्रेटीस



प्लेटो



ॲरिस्टॉटल

- ग्रीकांनी इहवादी तत्त्वज्ञाचा पाया घातला.
- तर्कशास्त्र व बुध्दिवाद हे ग्रीक तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे घटक होते.
- सॉक्रेटीस, प्लेटो व ॲरिस्टॉटल या तत्त्ववेत्त्यांनी जागतिक तत्त्वज्ञानात मोलाची भर घातली.

- तत्त्वज्ञान व वैज्ञानिक शोधांमुळे ग्रीकांचे जीवन वास्तववादी बनले.
- यातूनच युरोपात प्रबोधनास सुरुवात झाली.

ग्रीकांनी सांस्कृतिक जीवनात मोलाची कामगिरी केलेली आढळून येते.

आर्किमिडिज




भौतिकशास्त्रात आर्किमिडिजने सिध्दांत मांडले.

त्याबाबत एक दंतकथा आहे. ती पुढीलप्रमाणे –

फार जुन्या काळी सायरॅक्यूजच्या 'हिरॉन' नावाच्या  राजाने एका सोनाराला बोलावून स्वत:करिता सोन्याचा मुकुट तयार करण्यास सांगितले होते. सोनाराने मुकुट आणून दिला असता राजाला त्यात भेसळ केल्याची शंका आली. राजाने ही समस्या 'आर्किमिडीज' नावाच्या  वैज्ञानिकाकडे सोपवली. एका सकाळी विचारमग्न आर्किमिडीज आंघोळीसाठी टाक्यावर आला आणि त्याने पाण्यात उडी मारताच टाक्याच्या कडेवर पाणी उसळल्याचे बघितले. आर्किमिडीज त्याच अवस्थेत 'युरेका-युरेका' म्हणत राजाकडे धावत गेला. 'युरेका'चा अर्थ मला शोध गवसला असा होतो. आर्किमिडीजने तरंगण्याचा नियम राजाला विशद केला. एखादा घनपदार्थ द्रवात बुडवला तर त्याचे वजन कमी होते आणि त्याने उत्सारलेल्या द्रवाच्या वजनाएवढे ते असते. आर्किमिडीजच्या या नियमावरच जगातील सर्व धरणे बांधण्यात आली.

यामुळेच त्याला सोन्याच्या मुकुटातील भेसळ शोधता आली.

अशाप्रकारे त्याचा शोध पूर्ण झाला.

## कला व स्थापत्य –

- ग्रीकांनी बांधलेल्या मंदिरातून कलात्मकतेची व भव्यतेची जाणीव होते.
- ग्रीकांनी संगमरवरी दगडांचा वापर मनमोहक शिल्पांमध्ये केलेला दिसून येतो.






उदा –

खुले प्रेक्षागार (स्टेडीयम) एपिडॉरस  इ.स.पूर्व ३५० मध्ये बांधलेले आहे.



# कॉरिंथियन शैलीचा स्तंभ





डोरिक शैलीतील पार्थनॉन मंदिर, अक्रॉपलिस, अथेन्स, इ.स.पू. ४४७–४३८.

## क्रीडा –

- खेळ हा ग्रीकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता.
- ग्रीस मधील ऑलिंपिया येथे ग्रीक लोक खेळासाठी व खेळांच्या स्पर्धेसाठी एकत्र येत.
- ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा म्हणजे सदभावना, मैत्री व शांतता याचे प्रतिक होते.
- आधुनिक काळातील ऑलिंपिक स्पर्धेचे (इ.स. १८९६) मूळ प्राचीन ग्रीक स्पर्धेच्या प्रथेमध्ये आहे.
- आपण थाळी फेक हा खेळ खेळतो. त्याची सुरुवात ही ग्रीकांनीच केलेली आहे.

# धर्मकल्पना –

- झूस हा ग्रीकांचा सर्वश्रेष्ठ देव होता.
- हेरा, अपोलो, व्हिनस, मर्क्युरी या देवतांची  पूजा केली जात असे.
- प्रत्येक नगरांची स्वतंत्र नगरदेवता होती.
- देवतांना पशुबळी देण्याची प्रथा रुढ होती.
- स्त्रिया पौरोहित्य करीत असत.
- स्त्रियांनी सांगितलेल्या संदेशाला ओरॅकल म्हणत.

झूस - ग्रीकांची देवता



# Exercises

- खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. ग्रीक लोकांच्या देवतांची नावे सांगा.
२. स्त्रियांनी सांगितलेल्या संदेशाला काय म्हणत?
३. भूमितीचा जनक कोणाला म्हणतात?
४. शोकांतिका म्हणजे काय?

- ग्रीक कवी होमर याच्या इलियड व ओडिसी या महाकाव्यांची माहिती तुमच्या शब्दांत लिहा. व त्याची प्रत मिळवून नाटक सादर करा.
- सध्याच्या ऑलिंपिकच्या धर्तीवर शाळेचा क्रीडा महोत्सव आयोजित करावा.
- न्यूटन आणि सफरचंद, गुरुत्वाकर्षणाचा शोध याची माहिती शिक्षकांच्या मदतीने लिहा.
- नटसम्राट या मराठी भाषेतील शोकांतिकेचे वाचन करा.

# उत्तरे

❖ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. झूस, हेरा, अपोलो, व्हिनस, मर्क्युरी ही ग्रीक लोकांच्या देवतांची नावे आहे.
२. स्त्रियांनी सांगितलेल्या संदेशाला ओरॅकल म्हणत.
३. युक्लिडला भूमितीचा जनक म्हणतात.
४. शोकांतिका म्हणजे नाटकाचा शेवट दु:खदायक असणे.

# Assessment

- योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. इतिहासाचा जनक म्हणून ...... ला ओळखतात.

( हिरोडोटस, सॉक्रेटीस, प्लेटो )

२. आधुनिक काळात ऑलिंपिक स्पर्धा इ.स. ........ सालापासून सुरु झाल्या.

(१८९५ , १८९७ ,१८९६ )

३. ग्रीसमध्ये ....... हा महान कवी होऊन गेला.

( युक्लिड, होमर, क्रोमर )

४. ....... शैलीमध्ये पार्थनॉनच्या मंदिराचे बांधकाम झाले आहे.

( डोरिक, गांधार, हेमाड )